पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पुणे



# । मराठी विभाग ।

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती
## कार्यक्रमाचा अहवाल
## ३ जानेवारी २०१९

महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पत्रकार श्री. उद्धव धुमाळे यांनी सावित्रीबाईंच्या जीवन व कार्यावर आपल्या व्याख्यानातून प्रकाशझोत टाकला.
यावप्रसंगी श्री. धुमाळे म्हणाले, सावित्रीबाईंचे कार्य म्हणजे बहुजन स्त्रीमुक्तीचा समृद्ध देशी आविष्कार होता. आद्य गणमाता निऋति यांच्यापासून एक समृद्ध भारतीय बहुजन स्त्री परंपरा आपल्याकडे चालत आलेली आहे. सावित्रीबाई त्या परंपरेच्या पाईक होत्या. सावित्रीबाईंचे कार्य हे स्त्रियांच्या हक्कांसाठीचे एकंदर देश पातळीवरील सर्वांत मोठे व अतिशय महत्त्वाचे कार्य आहे. त्या भारतीय स्त्री शिक्षणाच्या आद्यप्रणेत्या व पहिल्या भारतीय महिला शिक्षिका होत. सावित्रीबाईंच्या प्रयत्नामुळे आजची भारतीय स्त्री शिकू शकली.

प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. विजय बालघरे यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय रोहिनी शेंडे या विद्यार्थीनीने करून दिला. सूत्रसंचालन प्रा. सुशील धसकटे यांनी, तर आभारप्रदर्शन प्रा. अनिता गाडेकर यांनी केले. या कार्यक्रमाला मराठी विभागातील सर्व प्राध्यापक, तसेच बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

स्थळ : मराठी विभाग । वेळ : सकाळी : १० वाजता

- डॉ. विजय बालघरे
मराठी विभागप्रमुख